# फळशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
ई- मेल : hdfs@pdkv.ac.in


जा. क्र. वि प्र/ फळशास्त्र/फभाप्रयुसऊकें./३२५/२०२३ दिनांकः २७/०७/२०२३
२८

## तत्कालीन मुलाखत

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत फळशास्त्र विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला येथे "फळ आणि भाजीपाला प्रक्रियेद्वारे युवा सबलीकरणासाठी उष्मायन केंद्राची स्थापना" करिता 'कुशल मदतनीस' या पदांकरिता अस्थायी स्वरुपात निश्चित वेतनावर, अर्हताप्राप्त उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला येथे दि. **१०/०८/२०२३ रोजी ठीक सकाळी १०. ३० वा.** मुलाखतीस हजर राहावे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | किमान अर्हता /पात्रता | दरमहा एकत्रित वेतन प्रती कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १. | कुशल मदतनिस | ०२ | कृषि विद्यापीठाचा कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण | रु. १००००/- (निश्चित वेतन) |

**वयोमर्यादाः**

उपरोक्त पदासाठी विहित केलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी मुलाखतीच्या दिनांकास ३५ वर्षे आणि मागास वर्गीय प्रवर्गातील (SC, ST, OBC) उमेदवारांकरिता ४५ वर्षे अशी राहील.

**कामाचे स्वरूपः**

कौशल्य सहाय्यक पदाकरिता खालील नमूद बाबीचे कौशल्य व ज्ञान असणे आवश्यक आहे.

१. उष्मायन केंद्रातील उपलब्ध भौतिक व पायाभूत सुविधांची देखभाल व व्यवस्थापन.
२. प्रकल्प अधिकारी यांना विहित प्रकल्पात युवकांना प्रशिक्षणा दरम्यान प्रक्रिया उत्पादन निर्मितीत साहाय्य करणे.
३. फळे व भाजीपाला प्रकीर्येद्वारे युवा सबलीकरणासाठीस्थापन केलेल्या उष्मायन केंद्रात वेळोवेळी सहाय्य करणे.

**नियम व अटी :**

१. सदरची नेमणूक हि पुर्णता तात्पुरत्या स्वरुपाची व कालमर्यादेची राहील.
२. मुलाखतीला येताना उमेदवाराने आपल्या शैक्षणिक अर्हता, वय जातीच्या प्रमाणपत्र आणि अनुभव प्रमाण पत्र तसेच कार्यरत असल्यास ना हरकत प्रमाणपत्राच्या मुळप्रती व दोन पासपोर्ट फोटो सोबत आणाव्यात. वयाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना नॉन क्रीमिलेयर/जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. सर्व मूळप्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित करुन १ प्रत मुलाखतीच्या वेळी; तसेच १ प्रत रुजू होते वेळी कार्यालयास सादर करावी. प्रमाणपत्र गहाळ असल्यास उमेदवाराला प्रतीक्षा यादीत ठेवले जाईल.

४. नावामध्ये बदल असल्यास राजपत्र (गजेट) जोडावे.

५. मुलाखतीस उपस्थित उमेदवाराना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता, मुक्कामाची सोय अनुज्ञेय राहणार नाही. जर मुलाखती करिता जास्त संख्येत उमेदवार उपस्थित झाल्यास सदर मुलाखत प्रक्रिया दुसर्या दिवसी घेण्यात येईल.

६. मुलाखतीसाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७. काही अपरिहार्य कारणास्तव सदरील तत्कालीन मुलाखती समोर ढकलण्या बाबतचे संपूर्ण अधिकार प्रकल्प प्रमुख यांचे राहतील.

८. उमेदवाराला प्रकल्पातील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी किवा डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे नियमित आस्थापनेसाठी दावा करता येणार नाही.

९. उमेदवाराचे काम समाधानकारक न आढळल्यास अथवा गैरवर्तणूक आढळल्यास तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकीचा कालावधी संपवण्यापूर्वी कोणतेही कारण न देता प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

१०. कार्यालयीन कामकाजाची वेळ विद्यापीठ नियमानुसार राहील. सुटीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित राहावे लागेल.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

# कुशल मदतनीस पदाकरिता अर्ज

उमेदवाराचा

फोटो

| | | |
|---|---|---|
| १. | संपूर्ण नाव | |
| २. | वडील/पतीचे नाव | |
| ३. | लिंग/वैवाहिकस्थिती | |
| ४. | जन्म दिनाक/वय<br>(१/८/२०२३३ रोजी)<br>प्रमाणपत्र जोडावे | |
| ५. | प्रवर्ग<br>SC/ST/OBC/VJ/NT/UR | |
| ६. | पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन) | |
| ७. | दूरध्वनी क्र. आणि ईमेल | |

८. शैक्षणिक अहर्ता:

| अनु. क्र. | उत्तीर्ण परीक्षा | विषय | मंडळ/विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | कालावधी (वर्ष) | /गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

९. अनुभव

| अ. क्र. | पदनाम | संस्था | अनुभव कालावधी | | वर्ष/महिने |
|---|---|---|---|---|---|
| | | | (दिनांक पासून) | (दिनांक पर्यंत) | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०. इतर माहिती

**टीपः जन्मदिनाक दाखला, शैक्षणिक अहर्ता / तांत्रिक अहर्ता, अनुभव ई. पुरावे सादर करतांना छायांकित प्रती साक्षांकित करुन पाठवाव्यात आणि मुळ प्रती पडताळणीच्या वेळी सादर कराव्यात.**

## <u>अर्जदाराचे जाहीरनामा</u>

मी जाहीर करतो, की, अर्जात नमूद संपूर्ण माहिती बरोबर आहे. मी असेही जाहीर करतो, की, (i) मला कुठल्याही शासकीय (राज्य/कैंद्र) स्वायत्त संस्था, ICAR मधुन दंडित किवा अकार्यान्वयीत करण्यात आलेले नाही. (ii) मला कुठल्याही न्यायालयाने दोषी ठरवून माझ्यावर गुन्हा दाखल केला नाही. मी अर्जात दिलेली माहिती नियुक्तीच्या आधी किवा नंतर खोटी/चुकीची अथवा अपात्र आहे असे निदर्शनास आल्यास माझ्या विरुद्ध होणाऱ्या कारवाईस पात्र असुन मला नियोक्ताचा निर्णय बंधनकारक राहील.

ठिकाणः

उमेदवाराचे नाव व सही

दिनाकः